<u>प्रसिद्धीसाठी</u>

# राजकीय पक्षांनी विविध मुद्यांवर घेतलेली भूमिका
# २०१४ लोक सभा निवडणूक

नागरिक चेतना मंच या संस्थेने सर्वश्री विश्वजीत कदम–काँग्रेस, अनिल शिरोळे–भाजप, सुभाष वारे–आप आणि दीपक पायगुडे–मनसे या माननीयांशी आम्ही तयार केलेल्या प्रश्नावली संबंधित संपर्क साधला आणि त्यावर त्यांचा प्रतिसाद मिळावा अशी विनंती केली. दुर्दैवाने मनसेकडून प्रतिसाद मिळाला नाही.

पक्षांच्या धोरणाविषयी किंवा त्यांच्या पक्षांच्या नीतीबद्दल विचारणा न करता, मंचाने १४ ज्वलंत प्रश्न माननीय नेत्यांसमोर ठेवले. आमचा भर पर्यावरणावर होता कारण सामान्य जनतेच्या जीवनावर पर्यावरणाचा दुष्परिणाम होतो व त्यांच्या जीवनाची पातळी खालावते. माननीयांचा प्रतिसाद पाहता स्पष्ट आहे की प्रमुख राजकीय पक्षांनी दुट्टपी भूमिका असंगत कारणास्तव धारण केली आहे. राजकीय पक्षांचा प्रतिसाद खाली दिलेल्या कोष्टकात दिला आहे.

| आप, बीजेपी व काँग्रेस एकत्र आहेत | आप व बीजेपी एकत्र आहेत |
|---|---|
| डोंगरावरचे रस्ते बनविण्याच्या आगोदर वाहतूक सर्वेक्षण व ईआयए केले पाहिजे | बेकायदेशीर बांधकाम नियमात बसवून कायदेशीर करणे |
| नद्या, नाले, ओढे इत्यांदींना आहे तसेच निसर्गावर सोपवावे. | पीएम्पीला पुणे मनपा व शासनाकडून सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यास अर्थसहाय्य नियमितपणे देणे |
| झाडांचे जतन व संरक्षण अधिनयमानुसार नदी काठी झाडे लावण्यास पाठिंबा | सल्लागारांनी तयार केलेल्या सर्वसमावेशक वाहतूक आराखड्याला पाठिंबा |
| हरित पट्टा व नाविकास क्षेत्रांचे नियमानुसार जतन करणे | |
| योजनाबध्द केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन बनविलेल्या बीआर्टीला पाठिंबा | |
| नागरी घनकचऱ्याचे उद्गमापाशी विलग्नीकरण करण्यासाठी पाठिंबा | |
| बॉंबे उच्च न्यायालयाच्या २०/९/१३ चा निर्णय व झाडांचे जतन व संरक्षण अधिनयमानुसार वृक्ष प्राधिकरणाची रचना करण्यास पाठिंबा | |

आमच्या अवगमानुसार आम आदमी पक्ष कोणत्याही जनहिताच्या विरोधात असलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देत नाही. परन्तू काँग्रेस व भाजप यापक्षांनी जनहिताविरोधात भूमिका खाली दिल्याप्रमाणे अंगीकार केली आहे.

| काँग्रेस | भाजप |
|---|---|
| कोट्यावधी रुपये खर्च करुन योग्य/उचित तपशीलवार प्रकल्प अहवाल नकरता उड्डानपुल बांधण्यास विरोध नाही. | कोट्यावधी रुपये खर्च करुन योग्य/उचित तपशीलवार प्रकल्प अहवाल नकरता उड्डानपुल बांधण्यास विरोध नाही. |
| मुख्य सभेच्या १८/०५/१२चा प्रस्ताव ज्यात सव-समावेशक वाहतक आराखड्याला मान्यता नसून फक्त मुख्य सभा त्यात जो बदल करेल त्यालाच मान्यता आहे याला पाठिंबा. | १० % बांधकामाला डोंगर पायथा/माथ्यावर परवानगी, वरकरणी बीडीपीला संरक्षण म्हणून! बांधकाम व्यवसिकांना ह्या भूमिकेमुळे चंगळ! |
| आधार नंबर देण्याच्या कार्यवाहीला पाठिंबा ज्यामुळे पैशाची अफरातफर, व्ययक्तिक स्वातंत्र्य व देशाच्या सुरक्षिततेला आमच्या मते धोका आहे. | आधार नंबर देण्याच्या कार्यवाहीला पाठिंबा ज्यामुळे पैशाची अफरातफर, व्ययक्तिक स्वातंत्र्य व देशाच्या सुरक्षिततेला आमच्या मते धोका आहे. |

वरील पक्षांच्या नगरसेवकांची पुणे मनपातील भूमिका त्यांच्या वरिष्ठांच्या मांडलेल्या भूमिकेच्या १८० अंश विरोधात आहे. उदा: वाहतूक सर्वेक्षण व ईआय्एला विरोध, नदी/नाल्यात काँक्रिटीकरणाला पाठिंबा, हरित पाट्टे व नाविकास क्षेत्र राखण्यास उपेक्षा, नदीकाठी नियमानुसार झाडे लावणे व त्यांचे जतन करण्याऐवजी बांधकामास परवानगी देणे, चुकीचा बीआर्टी राबविण्यास आर्थिक मंजुरी देणे, सर्व नियम व कायदे डावलून राजकीय कार्यकत्यांचा भरणा करुन वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करणे आणि उद्गमापाशी नागरी घनकचऱ्याचे विलग्नीकरण करण्यासाठी ठोस उपाय–योजना न करणे.

**नागरिक चेतना मंचाला जाणीव आहे की आप फारसे सत्तेत न राहिल्यामुळे त्यांच्या आश्वासनांना तेव्हडे महत्व देणे योग्य नाही.** परन्तू काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांची दुट्टपी भूमिका उघडकीस आली आहे. हे पक्ष योजनाबध्द विकास व पर्यावरण संवर्धनाला वरवर पाठिंबा दर्शवून नागरिकांची दिशाभूल करीत आहेत.

श्रीमती कनिझ सुखराणी
सदस्य, नागरिक चेतना मंच

१२ एप्रिल २०१४

मेजर जनरल सुधीर जटार, नि
अध्यक्ष, नागरिक चेतना मंच